**सई अभय लिमये**
इ. २री
कै. वा. दि. वैद्य मुलींची शाळा (नू.म.वि.)



भरपूर खेळायला, गाणी
गायला आणि
खूप मित्र-मैत्रिणी
करायला आवडतात.
गोष्टी ऐकायला आणि
सांगायलासुद्धा आवडतं.
वाचनाचं अफाट वेड,
त्यातूनच स्वतः गोष्टी तयार
करून सांगते,
स्पर्धांमधून भाग घेते.

बालभवन खूप आवडतं,
बंद असलं की करमत नाही.

**गरवारे बालभवन**
**कजा कजा मरू प्रकाशन**

किंमत - १५/-



# मनातली शाळा

**सई लिमये**

**मनातली शाळा**
सई लिमये

❒
प्रकाशक -
**कजा कजा मरू प्रकाशन**
द्वारा - गरवारे बालभवन,
सारसबागेसमोर, पुणे - ४११ ००२.

प्रथमावृत्ती : बालदिन - १४ नोव्हेंबर २००८

❒
मुखपृष्ठ व आतील चित्रे : सई लिमये

❒
मुद्रक :
माधव नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर,
९१४, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.


❒
मूल्य रुपये - १५/-

बालभवनमधे ६, ७, ८ नोव्हेंबर २००७ रोजी पर्यावरणविषयक प्रदर्शन झालं. त्यात दोन मोठी चित्रं तयार केली होती. एक होतं - हिरवीगार झाडी, नदी, स्वच्छ सूर्य यांच्यामधे असलेल्या बैठ्या, टुमदार घरांचं, तर दुसरं - सिमेंटच्या उंच इमारतींचं जंगल, डांबरी रस्ता, वाहनं, इलेक्ट्रिकच्या तारांचं जाळं, काळवंडलेला सूर्य असं. आपल्याला कोणतं चित्र आवडलं ? असा प्रश्न मुलांना, पालकांना केला होता. प्रदर्शन संपल्यावर एकदा माझी मुलगी सई - मला म्हणाली, 'तुला कुठलं चित्र आवडलं ?' मी म्हटलं, 'हिरवं !' तर ती वैतागून म्हणाली, 'मग तू इथं बिल्डिंगमधे का घर घेतलंस ? चल आपण जंगलात घर बांधू.' मी म्हटलं, 'अगं, जंगलात शाळाबिळा नसेल, बालभवन नसेल. तू मोठी झाल्यावर आपण जंगलात घर बांधू.' तिला ते पटलं. पण मग तिनं टूम काढली, 'आपण तिथल्या आदिवासी मुलांसाठी शाळा काढू या ! तिथंच घर बांधू या. 'आश्रमशाळा' काढू या !' (हा शब्द तिला आरुणीच्या, रामायण, महाभारतातल्या गोष्टींमुळे कळला होता.) मग तिला स्वतःलाच,


तिचीच ही कल्पना इतकी आवडली, की ती जवळजवळ २ तास याबद्दल बोलत सुटली. मधूनमधून मी फक्त तिला वाहतं / बोलतं रहाण्यासाठी मदत करत होते. तिच्या कल्पनेतली शाळा, तिथलं घर, तिथलं वातावरण हे सगळं फार स्वप्नमय होतं. ते बरंचसं तिच्याच शब्दांत, मांडण्याचा प्रयत्न करतेय...

सईची आई
(वीणा लिमये)






मी सई. पहिलीत जाते - नू.म.वि. शाळेत. मी बालभवनमधेही जाते. खूप मज्जा करते. मला बालभवन खूप आवडतं...



आमच्या बालभवनमधे एकदा पर्यावरण प्रदर्शन भरवलं होतं. त्यातलं जंगलातल्या, नदीजवळच्या घरांचं चित्र मला खूप आवडलं. शहराचं, डांबरी-काळ्या रस्त्याचं, बिल्डिंगा-बिल्डिंगांचं अजिबात नाही !



मी विचारलं, 'आपण का बिल्डिंगमधे राहतो ? जंगलात का नाही ?' आई म्हणाली, 'जंगलात शाळा, बालभवन नसतं. तू मोठ्ठी झालीस की आपण जंगलात घर बांधू.' मग मला एक आयडिया सुचली - मी आणि आईनं ठरवलं की, आश्रमशाळाच काढू या गोष्टीतल्यासारखी ! जंगलातल्या मुलांसाठी ! यैस् ... भारी आयडिया ! मी आणि आईने मग खूप गप्पा मारल्या.



जंगल पुण्याच्या जरा जवळ हवं, तिथे नदीपण हवी. तिथे जंगलातले सगळे प्राणी-पक्षी असतील. ते शाळेपाशी येतील. पण वाघ, सिंह आणि हत्ती नाही, बरं का !






'आश्रमशाळा' म्हणजे मुलं तिथेच रहाणार. मग घरं हवीतच; पण प्रदूषणवाली नकोत. मातीची घरं - मुलांना आणि आपल्याला रहायला ! विजेचे दिवे नक्की ! पलंगसुद्धा लाकडी किंवा मग दगडाचे. आपणच बनवू. पण ते मुलांना टोचतील ? हं, आपण छान मऊ गवत अंथरून देऊ त्यावर !




एक 'जेवणघर' हवं. आईनं, पुनुआत्या करते तसा, चुलीवर स्वयंपाक करायचा आणि गहू-तांदूळ ? शेत लावायचं का ? नको. ते जरा कठीण जाईल. ते पुण्यातून आणू. पण मी गाजराचे शेंडे ठेवलेत ते पेरू या. सशांना गाजरं खूप आवडतात ना ! म्हणजे ससे येतील, आश्रमशाळेत !






शिवाय मुलांना दूध लागेल. म्हणून आपण गायी पाळू. दूध मीच काढणार चुळ्ळुम्-चुळ्ळुम् ! शिवाय त्यांना चरायला नेणं, अंघोळ घालणं, गोठा साफ करणं - आपण सगळ्या मुलांना ही कामं वाटून देऊ.



मुलांनी सकाळी प्रार्थना म्हणायची, व्यायाम करायचा, दूध पिऊन गायींना चरायला न्यायचं. आईला बागेतली भाजी आणून द्यायची, चुलीसाठी फाटी आणून द्यायची - झाडझूड करायची, झाडांना पाणी घालायचं. मग अंघोळ, कपडे धुणं - नदीवर....यैस् ... मज्जा-धम्माल !






अंघोळीनंतर स्वयंपाकघरात केळीच्या पानावर नाश्ता - मग शाळा सुरू.. छोट्या वर्गांना मीच शिकवणार. मी तोवर मोठ्ठी झालेली असणार ना ! मोठ्या वर्गांना मात्र बाबा, आई, काका, काकू, आत्या, दादा शिकवतील !





शाळेत एका खोलीत पेटी, तबला, बासरी, तंबोरा असणार। कोणीही यातलं काहीही वाजवू शकेल। कुणी रागावणार नाही।








शाळेत नुसता अभ्यास घ्यायचा नाही काही ! खेळ, गाणी, गोष्टी, नाच... मजा मजा असणार। नाच, गाणं नि चित्रकला मीच शिकवणार। म्हणूनच माझं हे सगळं शिकून झाल्यावर... म्हणजे १८वीत किंवा १६वीत ही शाळा काढायची।



शाळेला शनिवार-रविवार सुट्टी ! आई म्हणते, जंगलातल्या लोकांना छान-छान वस्तू येतात. आपण शनिवार-रविवारी त्यांच्याकडून शिकू या ! पण नाही बाबा ! शनिवार-रविवारी सुट्टीच हवी !







मुलं शाळेतून आली की भरपूर खेळायचं. हात-पाय धुवून खाऊ खायचा, प्रार्थना म्हणायची. मग जेवायचं. घराच्या अंगणात गप्पा-गोष्टी करायच्या, चांदण्या बघायच्या आणि मग झोऽऽप...

आणि ही... जंगलातल्या शाळेत बालभवन तर हवंच... मोकळी जागा तर भरपूर असेलच, झोके नि घसरगुंडी झाडाला लावू आणि बालभवनसाठी मात्र शोभाताई, शमाताई, वासंतीताई, संध्याताई, नंदिनीताई यांना विचारायला हवं!






**गरवारे बालभवननिर्मित मुलांसाठी**
**मुलांच्या विश्वातील सुंदर कवितांच्या व गाण्यांच्या कॅसेटस् -**

**झुळझुळ गाणी**

**पपूने केले साबणाचे फुगे**
- शांता शेळके

**पाऊस आला टप टप**
- सरिता पदकी

**मी आहे जादूवाला**
- गावंडे गुरुजी

**या रे या सारे या**
- श्यामला वनारसे

**माझ्या बोटात जादू आहे**
- शोभा भागवत

अशी १८ गाणी
किंमत रु. ४०/-




**इवली इवली चांदणी**

**मुले झाली फुले**
- शांता शेळके

**इवली इवली चांदणी**
- मंगेश पाडगावकर

**एक छोटं बी**
- अरुणा ढेरे

**जयरंग श्रीरंग**
- वसंत बापट

**आम्ही आकाश बघू**
- शोभा भागवत

अशी १२ गाणी
किंमत रु. ४०/-

